स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

विष्णुपुरी, नांदेड – ४१३ ६०६ (महाराष्ट्र)

इतिहास विभाग मानवविद्या संकुल स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा नांदेड अंतर्गत पीएच.डी. (इतिहास) पदवीसाठी सादर करावयाच्या

शोध प्रबंधाची रूपरेखा

आर. आर. पाटील जीवन व कार्य : एक ऐतिहासिक अभ्यास (सन १९५७–२०१५)

संशोधक

साळुंखे रविराज रामचंद्र

(एम.ए.)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुर्यवंशी नारायण बाबूराव

(एम.ए., एम.फिल, पीएच.डी.)

इतिहास विभागप्रमुख

शिवनेरी महाविद्यालय, शिरूर, अनंतपाळ,जि. लातूर.

संशोधन केंद्र

सन २०१७
अनुक्रमणिका

अ.नं.	तपशील	पृष्ठ क्रमांक
१)	प्रस्तावना	१–२
२)	विषयाचे महत्त्व	३
३)	पूर्व संशोधन आढावा	४–७
४)	संशोधन विधान, उद्दिष्ट्ये, गृहितके	७–८
५)	संशोधन व्याप्ती	८–९
६)	संशोधन पद्धती	९–१०
७)	नियोजित प्रकरण विभागणी	१०–११
८)	संदर्भ साधने	१२–१३

आर. आर. पाटील जीवन व कार्य: एक ऐतिहासिक अभ्यास
(सन १९५७-२०१५)

प्रस्तावना :

इतिहासातल्या आदर्श व्यक्ती समाजाला नेहमीच प्रेरणा देत असतात. आपल्या समकाळातही असे आदर्श असतात, त्यापैकी एक म्हणजे आर.आर.पाटील होते. भारतीय स्वातंत्र्यानंतर भारताने संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. लोकशाहीमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाल्याने अनेक ग्रामीण भागातून नेतृत्वे उदयास आली. अशाच ग्रामीण भागातून उदयास आलेले राजकारणाची दिशा बदलणारे नेतृत्व मा. आर. आर. पाटील होते. सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुका हा खडकाळ माळरानाचा दुष्काळाची छटा असलेला तालुका आहे. अंजनीसारख्या छोट्या खेड्यातून त्यांचे नेतृत्व उदयास आले. रोजगार हमी योजनेत काम करत शांतीनिकेतन महाविद्यालयातून 'कमवा व शिका' या उपक्रमातून त्यांनी आपले बी.ए. (राज्यशास्त्र) शिक्षण पूर्ण केले. पदवी पाठोपाठ त्यांनी कायदे शिक्षणाची पदवीही पूर्ण केली. काँग्रेस पुढाऱ्यांच्या सभा घेत असताना त्यांना ग्रामीण भागातील प्रश्नांची प्रकर्षाने जाणीव झाली. आर.आर.पाटील यांनी आपल्या राजकारणाची सुरूवात जिल्हा परिषदेपासून केली. ग्रामीण भागातील लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते ११ वर्षे जिल्हा परिषदेत कार्यरत राहिले. १९७९ ते १९९० या काळात सांगली जिल्हा परिषदेचे सदस्य म्हणून नेत्रदीपक कार्य त्यांनी केलेले होते. १९९० ला पहिल्यांदा विधान सभेची निवडणूक जिंकून विधानसभेत प्रवेश केला. महाराष्ट्रातील जनतेस भेडसवणाऱ्या अनेक प्रश्न लक्षवेधीने मांडून सोडविले. युती सरकारच्या काळात लक्ष्यवेधीकार आमदार व उत्कृष्ट संसदपट्टू असा सन्मानही मिळविला. १९९०-१९९५ या काळात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेता म्हणून कार्यरत होते.

१९९९ ला आर.आर.पाटील ग्रामीण विकास, स्वच्छता व पाणीपुरवठा मंत्री बनले. 'खेडी स्वयंपूर्ण झाली पाहिजेत' हा महात्मा गांधीजींचा विचार डोळ्यासमोर ठेवून संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान यशस्वीपणे राबविला. ग्रामस्वच्छता अभियानाच्या यशामुळे गाव विकासासाठी यशवंत ग्रामसमृद्धी योजना पुढे आणली. या योजनेने ग्रामीण भागाचा पाण्याचा प्रश्न सोडविला. शांतता आणि स्वच्छता अशा दोन बाबी आहेत की, त्याच्याअभावी विकासाला गती येत नाही. ''महात्मा गांधी तंटामुक्त अभियान'' गाव प्रगतीचा सोपा मार्ग अशी भूमिका या अभियानामागील आर.आर.पाटील यांची होती. त्यांनी ग्रामविकास मंत्री असताना पंचायत राज व्यवस्थेचे विकेंद्रीकरण केले. २००३ ला महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रवादी कॅाँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही आबांचे कर्तृत्व नोंद घेण्यासारखे आहे. २५ डिसेंबर २००३ रोजी महाराष्ट्राचे गृहमंत्री म्हणून कार्यभार स्वीकारला. या काळात डान्सबार बंदी, पोलीसांसाठी केलेल्या सुधारणा, गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री पद या संदर्भातील कार्य ही भरीव स्वरूपाचे होते. तासगावला पाणी आणणे हे आबांचे स्वप्न होते. आर.आर.पाटील यांच्या नियोजनामुळे व कार्यामुळे हे शक्य झाले. म्हैसाळ-तकारी, आरफळ कलवा, विसापूर-पुणदी या योजनेचे पाणी तालुक्यात आणून २० वर्षाचे बळीराजाचे स्वप्न पूर्ण केले. गडचिरोलीचे पालकमंत्री असताना सामाजिक जाणिवेतून व परिवर्तनासाठी आबांनी १२२ गावे प्रकाशमय करण्याचा निर्णय घेतला. ५ नवीन औद्योगिक संस्था व १०० खाटांचे रूग्णालय सुद्धा मंजूर करून कार्यान्वीत केले.

सांगली जि.प.सदस्य, आमदार, महाराष्ट्राचे ५ वेळा कॅबिनेट मंत्री, उपमुख्यमंत्री, गृहमंत्री अशा स्वरूपात आबांनी सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य केले. राजकारण करत असताना व मंत्रीपदाच्या प्रत्येक कालखंडात नव्या कल्पना घेऊन त्यात लोकांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न असे. राजकीय व सामाजिक वाटचालीत आपल्याला सर्वसाधारणपणे दोन

प्रकारचे लोकप्रतिनिधी आढळून येतात. मागील पानावरून चालू असे म्हणत परिस्थितीची अपरिहार्यता निमूटपणे स्वीकारणारे, दुसरे प्रबळ इच्छा शक्तीद्वारे प्रतिकूल परिस्थितीला अनुकूलतेमध्ये परिवर्तीत करणारे आर.आर.पाटील दुसऱ्या वर्गवारीत बसणारे नेतृत्त्व होते.

विषयाचे महत्त्व

पुरोगामी महाराष्ट्राला ऐतिहासिक, शैक्षणिक, राजकीय वारसा लाभला आहे. महाराष्ट्राला अनेक दुरदृष्टी, लोकहित, शेतकऱ्याचे प्रश्न, विकास यासाठी भरीव कार्य करणारे नेते लाभले. याच वारशाचे जतन आर.आर.पाटील यांनी आपल्या कार्यातून पुढे चालविले. तासगाव–कवठे महांकाळ मतदार संघाची प्रगती करण्याबरोबर राजकारणातून समाजकारणाची परिभाषा एका वेगळ्या उंचीवर आर.आर.आबांनी नेऊन ठेवली. भूतकाळातील प्रत्येक घटनेमधून आबा शिकत गेले. महाराष्ट्राच्या राजकारणात खात्रीचा व क्रियाशील नेता म्हणून जनता त्यांच्याकडे पाहत होती. राजकारणाचा इतिहास पाहिला तर अनेकजण राजकीय व सामाजिक कारकिर्दीमुळे प्रकाशझोतात आले. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, डान्सबार बंदी, गडचिरोलीचे पालकमंत्री, महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान या माध्यमातून समाजपरिवर्तनाचे कार्य केले. सत्तासंघर्ष आणि पंचतारांकित जगण्याची राजकारण्यांची निती यामुळे राज्यातील मूळ प्रश्नांची उकल पूर्णपणे होऊ शकली नाही. पंचतारांकित संस्कृतीसाठी न बोलता जनसामान्यासाठी हितासाठी आबा पोटतळमळीने कार्य करीत होते. राजकारण व सत्ता या समीकरणाऐवजी जनहित हेच स्वत:चे कल्याण मानणारे नेतृत्त्व आर. आर. पाटील होते. आर. आर. पाटील यांचे महत्त्वाचे निर्णय, कार्य, अंमलबजावणी निर्णयासंदर्भातील भूमिका यामुळे प्रकाशझोतात आले. त्यांच्या जीवन कार्यातून हा तपशील अधिक विश्लेषितपणे अभ्यासता येईल. महाराष्ट्राच्या समस्यांचा शोध आणि बोध आबांनी वेळोवेळी मांडला. महाराष्ट्रात अनेक अडचणी असताना सर्वांगीण प्रगतशील, विकसित महाराष्ट्र घडवण्याचे आर. आर. पाटीलांचे ध्येय होते. समाजाच्या व्यापक हितासाठी

ते नेहमीच चिंतन करायचे. सार्वजनिक, राजकीय, सामाजिक जीवनात साधेपणा, प्रामाणिकपणा व स्वच्छ चरित्र्याचा आदर्श उभा करणारा नेता होते. पुरोगामी विचारांचे राजकारण, सामाजिक जाण, विनम्रता, उत्तम वक्ता असे *'कॉमन मॅन'* वाटणारे आबांचे नेतृत्त्व होते. एकप्रकारे आबांचे जीवन व कार्य हे सत्तेचा वापर लोकहित, परिवर्तन, लोकानुवय कसा करावा याचे *'आयडॉल'* रूप होते. राजकारण व नवीन राजकारणात येऊ पाहणारे यांना मार्गदर्शक दिशा देणारे नेतृत्त्व म्हणून त्यांच्या जीवन व कार्याचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

पूर्व संशोधनाचा आढावा

१) साबळे शर्मिला अशोक, वसंतराव नाईक यांचे जीवन व कार्य, शोधप्रबंध सादर (२००७), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री, मानवतेचे पुजारी ठरलेले वसंतराव नाईक यांच्या जीवन व कार्याचा आढावा घेतला आहे. मुख्यमंत्री पदाच्या अखंड अकरा वर्षाच्या कारकिर्दीला ऐतिहासिक महत्त्व आहे. वसंतराव नाईक यांचे सामाजिक, राजकीय व कृषी क्षेत्रातील कार्य दैदिप्यमान आहे. १९६३ ते १९७५ या दीर्घ कालखंडात मुख्यमंत्री म्हणून महाराष्ट्राला स्थिर प्रशासन दिले. १९६३ साली आपल्या कारकिर्दीत शेती, अन्नधान्य, एकाधिकार योजना, रोजगार हमी योजना व कापूस एकाधिकार योजना कार्यान्वीत केल्या. दारूबंदीविषयक नवे धोरण, सीमाप्रश्न, शासनात मराठीचा वापर, कुटुंब नियोजन, गोवा विलिनीकरण, दक्षता आयोग या संदर्भात केलेले भरीव कार्य यांचा आढावा चिकित्सकपणे घेतला आहे. या प्रबंधामध्ये या सर्व कार्याचा विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीने आढावा घेतला आहे.

२) मोहिते कल्पना राजीव, डॉ. पंजाबराव देशमुख यांचे जीवन व कार्य १८९८-१९६५, शोधप्रबंध सादर (२००३), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

प्रस्तुत संशोधन प्रबंधामध्ये डॉ. पंजाबराव देशमुख यांनी शिक्षणप्रसार कृषीसुधार, कृषककल्याण, अस्पृश्यता निवारण, मिश्र विवाह, गोरगरिब, दलितांकरिता श्रद्धानंद वसतिगृह अशा स्वरूपाचे कार्य केले. कृषीखात्याचे स्वतंत्र भारताचे मंत्री, शेतकरी, मजूर दलिताकरिता शाळा, खादी प्रचार या संदर्भात कार्य केले. आंतरराष्ट्रीय ग्रामीण युवक परिषदेचे अध्यक्ष होते. श्री शिवाजी एज्युकेशन ट्रस्टची स्थापना लंडन येथे केली. कृषीविषयक अनेक संस्थाचे संस्थापक अध्यक्ष होते. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व कृषीक्षेत्रातील कार्य उल्लेखनीय आहे. शाहू , फुले यांच्या विचारास अनुसरून त्यांनी कार्य केले. विदर्भातील शैक्षणिक कार्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. स्वतंत्र भारताचे कृषीमंत्री व हरितक्रांतीचे प्रणेते म्हणून डॉ. पंजाबराव देशमुखांचे कार्य या प्रबंधात संशोधकाने चिकित्सकपणे विश्लेषितपणे सविस्तर मांडले आहे.

३) मोरे संभाजी आनंदा, पंढरीनाथ सिताराम पाटील यांचे जीवन व कार्य, शोधप्रबंध सादर (२००७), शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रस्तुत अप्रकाशित संशोधन प्रबंधामध्ये खासदार श्री पंढरीनाथ सीताराम पाटील यांचे जीवन व कार्याचा अभ्यास करण्यात आला आहे. शिक्षणप्रसार, कृषीसुधारणा, अस्पृश्यता निवारण, मिश्रविवाह, सत्यशोधक समाज, ब्राह्मणेत्तर समाज, शेतकरी संघटना यासारख्या अनेक क्षेत्रामध्ये स्वत: कर्तृत्वाने आपला वेगळा ठसा विदर्भात निर्माण केला होता. महात्मा फुलेप्रणीत तत्त्वानुसार सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व कृषीक्षेत्रातील त्यांचे कार्य दैदिप्यमान आहे. मागासवर्गीयांसाठी त्यांनी केलेले कार्य अविस्मरणीय व मूलगामी स्वरूपाचे

आहे. त्यांनी केलेले शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक कार्य आजही विदर्भात त्यांचे जीवंत स्मारक ठरले आहे.

ब्रिजलाल बियानी यांच्या संयुक्त महाराष्ट्रविरोधी महाविर्दभ वादाचा पाडाव करणारे पंढरीनाथ पाटील हे पहिले नेते होते. पंढरीनाथ पाटील यांच्या जीवन कार्यासंदर्भात विस्तृत सूक्ष्मपणे समग्र अशी माहिती या प्रबंधात संशोधकाने मांडली आहे. प्रस्तुत शोध प्रबंधात वरील उल्लेखित कार्याचा विस्तृत व चिकित्सकपणे आढावा घेतला आहे.

४) प्राचार्य डॉ. पाटील दिनकर, गरूडभरारी, अजिंक्य प्रकाशन, कोल्हापूर

प्रस्तुत प्रकाशित चरित्रमय ग्रंथात मा. श्री. आर. आर. पाटील यांच्या चरित्राचा आढावा घेतला आहे. आर. आर. पाटील यांचे व्यक्तिमत्व व त्यांचे अफाट कर्तृत्व आणि प्रचंड कार्य शब्दबद्ध करून या प्रस्तुत चरित्रातून मांडले आहे. शांतीनिकेतन महाविद्यालयात सुरू केलेल्या 'कमवा व शिका' या योजनेतून कला शाखेचे शिक्षण पूर्ण केले. वक्तृत्व ही कला आबांच्या जडणघडणीतील महत्त्वाची गोष्ट होती. काँग्रेसचे ते स्टार प्रचारक झाले. ११ वर्षे आबांनी जि.प.मध्ये उत्कृष्ट कार्य केले. फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचाराची बैठक असलेले स्त्री शक्तीचे जाण असलेले नेतृत्त्व होते. १९९० साली आबांनी विधानसभेत प्रवेश केला. ही कारकिर्द लक्ष्यवेधीकार म्हणून गाजली. त्यांनी पाणी योजना, डान्सबार बंदी, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, महात्मा गांधी तंटामुक्त योजना, गडचिरोलीचे पालकमंत्री या सर्व कार्यासंदर्भात भरीव कार्य केले.

ग्रामीण महाराष्ट्राच्या उभारणीला नवी दिशा आणि गती देण्याचे क्रांतीकारक काम आर. आर. पाटील यांनी केले. प्रस्तुत चरित्रग्रंथात आर. आर. पाटील यांचे जीवनसंघर्ष, विचार व कार्याचा थोडक्यात आढावा लेखकाने घेतला आहे.

५) पाटील आर. आर. (आबा), मी कसा घडलो, संस्कृती प्रकाशन, पुणे

प्रस्तुत प्रकाशित आत्मचरित्र पुस्तकामध्ये स्वत: आर. आर. पाटील यांनी थोडक्या शब्दामध्ये 'आयुष्यात मी कसा घडलो' याचे विवेचन केले आहे. बारामतीमधील शारदा व्याख्यानमालेत अंजनीसारख्या खेड्यापासून सुरू झालेला राजकीय प्रवास या व्याख्यानात सांगितला. हा प्रवास या पुस्तिकेत शब्दबद्ध केला आहे. जिल्हा परिषदेमधील कार्याचा ओझरता उल्लेख यामध्ये केला आहे. लक्षवेधीकार आमदार त्यांना का म्हटले जाते याचे उत्तर या पुस्तकातून मिळते. यशवंत ग्राम समृद्धी योजना, राष्ट्रवादी पक्षाचा पूर्णवेळ प्रदेशाध्यक्ष व डान्सबार बंदी का केली? याची कारणमीमांसा त्यांनी यामध्ये सांगितली आहे. प्रस्तुत आत्मचरित्रपर ग्रंथात आपले जीवन कसे घडले व काही निर्णय, कार्य यांचा थोडक्यात मजकूर यामधून त्यांनी सांगितला आहे. आपल्या जीवनाची व कार्याची पद्धतशीर व थोडक्यात संक्षिप्त मांडणी आबांनी स्वत: केली आहे.

आर. आर. पाटील यांच्या जीवन व कार्यासंदर्भात वृत्तपत्रे, मासिके या माध्यमातून लिखाण झालेले आहे. मात्र ऐतिहासिक दृष्टिकोनातून या संदर्भात संशोधन झालेले नाही. समकालीन इतिहासाच्या दृष्टीने प्रस्तुत विषयावर मी संशोधन करणार आहे.

संशोधन विधान

महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक यशस्वी राजकारणी होऊन गेले. सद्य:परिस्थितीत राजकारण व राजकारण्याची पद्धती व दिशा बदलली आहे. या पार्श्वभूमीवर आर. आर. पाटील यांचे जीवन कार्य हे नव्याने राजकारणात येऊ इच्छिणाऱ्यासाठी व राजकारण्यासाठी दीपस्तंभाप्रमाणे आहे. क्रांतीकारी निर्णय घेऊन समाजपरिवर्तनाची दिशा ठरवणारे असे

सर्वसामान्य नेतृत्व आबांचे होते. त्यांना अपेक्षित असणारे समाजपरिवर्तन, त्यांची वैचारिक मांडणी काय होती याचा शोध संशोधनात घेतला जाणार आहे.

उद्दिष्ट्ये

१. आर. आर. पाटील यांचे पूर्व चरित्र व राजकारणात प्रवेश याचा शोध घेणे.

२. आर. आर. पाटील यांची सार्वजनिक जीवनातील सक्रिय सुरूवात, राजकारण, समाजकारण, जि. प. कारकिर्द याची विश्लेषणात्मक चिकित्सा करणे.

३. आर. आर. पाटील यांनी मतदार संघात केलेल्या विकासकामांचा अभ्यास करणे.

४. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व तंटामुक्त गाव अभियान, इतर योजनांचे चिकित्सक परीक्षण करणे.

५. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री असताना डान्सबार बंदी, गडचिरोलीचे पालकमंत्री, पोलीसांसाठी विविध योजना यांचा आढावा घेणे.

६. लोककल्याण, जनहिताचे निर्णय, समाजसेवा, राजकीय विचार व चिंतन यांचा समीक्षा करणे.

गृहितके

१. इतिहासाचा साकल्याने विचार करता नेतृत्व, कर्तृत्व, समाजहित व परिवर्तनाची जाण असलेल्या स्त्री-पुरुषामुळेच समाज बदलला जातो.

२. समाजाच्या प्रगतीसाठी काय केले पाहिजे? व नेमक्या गरजा काय आहेत हे लोकशाहीतील नेते ठरवित असतात.

३. राजकारण, समाजकारण, समाजहित या भिन्न बाबी एकत्र आणून आर.आर. पाटील यांनी कार्य केले.

४. विकसित समाजासाठी, सुधारणावादी, सामाजिक परिवर्तनासाठी राजकारणाचा व सत्तेचा वापर करणारे नेते सामाजिक बदल घडवून आणू शकतात.

५. समाज बदलासाठी राजकारणी जरी ध्येयनिष्ठ असला तरी सत्तांतरानंतर योजना, कार्य याची लोकमनास विस्मृती होते.

६. राजकारणातून समाजकारणाची दिशा ठरवत असताना समाजाच्या बाबींचा कलही विचारात घ्यावा लागतो.

७. आर.आर. पाटील यांनी सक्रिय राजकारणात असताना केलेली विविध विकास कामे व कार्यामुळे आदर्श राजकारणी कसा असावा याची आदर्श संहिता तयार केली.

संशोधन व्याप्ती

प्रस्तुत संशोधनाच्या व्याप्तीमध्ये अंजनी ते मुंबई हा प्रवास आर. आर. पाटील यांचे जीवन व कार्य (१९५७ ते २०१५) या माध्यमातून सूक्ष्मपणे अभ्यास करण्यात येणार आहे. अंजनीसारख्या छोट्या खेड्यातून कोणताही राजकीय वारसा नसताना त्यांनी उपमुख्यमंत्री पदापर्यंत घेतलेली झेप असामान्य आहे. ग्रामीण पार्श्वभूमीबद्दल अधिकारवाणी व सर्व गोष्टी ज्ञात असणारे असे आर. आर. पाटील होते. यामुळे आबांचा कॉंग्रेस प्रवेश झाला. १९९५-९६ मध्ये उत्कृष्ट संसदपटटू हा पुरस्कार देण्यात आला. डान्सबार बंदी हा पुरोगामी महाराष्ट्रात त्यांनी घेतलेला महत्त्वपूर्ण व धाडशी निर्णय होता. संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान व महात्मा गांधी तंटामुक्त गाव अभियान या योजना विधायकपणे महाराष्ट्रात राबवून यशस्वी केल्या. ग्रामविकासाच्या योजना राबवून महाराष्ट्रातील गावागावांचा चेहरा-मोहरा आबांनी बदलला. गृहमंत्री असताना पोलीसांच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्या. यशवंत ग्राम समृद्धी योजना आबांनी आणली व गावाच्या कामासाठी १५% लोक वर्गणी व ८५% रक्कम सरकार या

योजनेलाही पाठिंबा मिळाला. विकासामध्ये त्यांनी आरफळ, ताकारी-म्हैसाळ, टेंभू योजना पुर्णत्वास नेल्या. सुसज्ज प्रशासकीय इमारत, वसतिगृहे, क्रीडा संकुलाची उभारणी हे कार्य पूर्णत्वास नेले. तासगाव शहराच्या विकासासाठी शक्य ते सर्वोतोपरी प्रयत्न केले. तासगाव झोपडपट्टी मुक्त करण्यासाठी एकात्मिक गृहनिर्माण आणि झोपडपट्टी विकास कार्यक्रम त्यांनी यशस्वीपणे राबविला. सुरूवातीच्या आमदार पदाच्या काळात ग्रामीण प्रश्न समस्या सोडविण्यासाठी संसदीय अस्त्र लक्षवेधीचा प्रभावी वापर केला. आर. आर. पाटील यांचे कार्य, निर्णय कसे पूर्ण केले याचा सविस्तरपणे, सूक्ष्मपणे, सखोलपणे, विश्लेषणात्मक पद्धतीने या प्रस्तुत संशोधनात हा अभ्यास करण्यात येणार आहे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत विषयावरील संशोधन करण्यासाठी विश्लेषणात्मक व समकालीन ऐतिहासिक (Contemparary History) अभ्यास या पद्धतीचा अवलंब केला जाईल. प्रस्तुत संशोधनासाठी ग्रंथालयीन अभ्यास पद्धतही वापरता येईल. संकलित केलेल्या माहितीच्या आधारे माहितीचे वर्गीकरण, जीवनप्रवास, कार्य, निर्णय, अंमलबजावणी, समाजहिताचे निर्णय या माहितीचे वर्गीकरण करून समकालीन इतिहासाच्या दृष्टीने विश्लेषण केले जाईल. या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम साधनांचा आधार घेता येईल.

१) प्राथमिक साधने

प्राथमिक साधने म्हणून आर. आर. पाटील यांनी स्वत: लिहिलेल्या व्याख्यानपर प्रकाशित झालेल्या 'मी कसा घडलो' या व्याख्यानाचे चरित्ररूप प्रकाशन याचा या संशोधनात

अभ्यास करण्यात येणार आहे. जिल्हा परिषद, पंचायत समिती, विधानसभा, गृहमंत्रालय, ग्रामविकास व पाणी पुरवठा या ठिकाणी असताना घेतलेले निर्णय, अंमलबजावणी, आदेश याबाबत असणारी सर्व कागदपत्रे यांचा समावेश करण्यात येणार आहे. आर. आर. पाटील कार्यरत असताना विविध वृत्तपत्रांनी काढलेले विशेषांक, लेख, पुरवण्या, मासिके, मुलाखती या साधनांचा समावेश करण्यात येणार आहे.

२) दुय्यम साधने

प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम साधनांचाही आधार घेण्यात येणार आहे. ज्यांचा त्यांच्याशी जवळून संबंध आला असे लेखक त्यांनी त्यांच्या जीवन कार्यावर लिहिलेली पुस्तके, नियतकालिके, अप्रकाशित ग्रंथ, इंटरनेट या साधनांचा वापर करण्यात येणार आहे. प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी वरील प्राथमिक व दुय्यम या दोन्ही साधनांचा वापर करून संशोधन पूर्ण करण्यात येणार आहे.

नियोजित प्रकरण विभाग

प्रकरण पहिले – आर. आर. पाटील जीवनवृत्तांत

जन्म – बालपण – संस्कार – शिक्षण – वैवाहिक जीवन – तत्कालीन वृत्तांत या संदर्भात विवेचन व स्पष्टीकरण.

प्रकरण दुसरे – आर. आर. पाटील यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास व जिल्हा परिषदेमधील योगदान

२.१ आर. आर. पाटील यांच्यावरील व्यक्तिमत्वाचा प्रभाव

२.२ पाणी परिषद

२.३ सामाजिक कार्य

प्रकरण तिसरे – तासगाव, कवठे–महांकाळ मतदार संघातील कल्याणकारी योजना

मतदार संघाच्या विकासाच्या कामाचा आढावा

प्रकरण चौथे– आर. आर. पाटील यांची विधानसभेतील कामगिरी

४.१ लक्षवेधी कामगिरीचा अभ्यास

४.२ विरोधी पक्षनेता म्हणून कार्य

४.३ मंत्री पदावर असतानाचे कार्य

प्रकरण पाचवे – आर. आर. पाटील यांचे ग्रामविकास मंत्री व सहकारातील योगदान

५.१ संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

५.२ यशवंत ग्राम समृद्धी योजना

५.३ साखर कारखाने, सुतगिरण, शिक्षण, बँका या क्षेत्रातील कार्य

प्रकरण सहावे – आर. आर. पाटील यांचे गृहमंत्री व उपमुख्यमंत्री काळातील कार्य

६.१ पोलीस भरती

६.२ खाजगी सावकारकीला आळा

६.३ महात्मा गांधी तंटामुक्त योजना

६.४ डान्सबार बंदी

प्रकरण सातवे – निष्कर्ष

७.१ प्रकरणनिहाय सारांश

७.२ ठळक निष्कर्ष

७.३ सैद्धांतिक मांडणी

७.४ उपसंहार

संदर्भ ग्रंथ

१) पाटील आर. आर., (२००८), 'मी कसा घडलो', मनोरमा प्रकाशन, पुणे.

२) प्रा. देशमुख एल. जी. (संपा.), 'उज्ज्वल महाराष्ट्रासाठी', डायमंड प्रकाशन, पुणे.

३) प्राचार्य डॉ. पाटील दिनकर, 'गरूड भरारी', अजिंक्य प्रकाशन, कोल्हापूर.

४) भालेराव इंद्रजीत, 'प्रिय आबा', जनशांती प्रकाशन, सातारा.

५) श्री. साळुंखे श्रीधर, 'सहृदयी योद्धा', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६) श्री. माने रविकिरण, 'दूरदृष्टीचा नेता', स्वामी पब्लिकेशन, पुणे, १९९२.

७) कांबळे उत्तम, 'सहृदयी नेता', साई प्रकाशन, नाशिक, २००७.

८) लक्षवेधविकास योजनांचा, जनशक्ती प्रकाशन, सांगली,२००४.

९) प्राचार्य भागवत रा. तु., 'संत गाडगेबाबा स्मारक ग्रंथ', चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर,१९९८.

१०) चव्हाण वाय. बी., 'बिकट वाट नाजुक गाट, वाय.बी. चव्हाण सेंटर, मुंबई, २०१२.

११) मंत्री कालखंडामधील विधानसभेतील चर्चा, प्रस्ताव, उत्तरे, निर्णय या संदर्भातील इतिवृत्ते, कागदपत्रे, विधानभवन, मुंबई.

१२) ग्रामविकास व गृहमंत्रालयाने आर. आर. पाटील यांच्या काळात घेतलेले निर्णय, *प्रेस नोट, कॉन्फरन्स.*

मासिके, विशेषांक

१) साप्ताहिक कुलभूषण, संपादक धिरज भिंगारदिवे, गौरव अंक, २००७.

२) मा. आर. आर. पाटील ज्ञान प्रबोधिनी, तासगाव, ०२/०९/१९९६, गौरव विशेषांक.

३) 'रयतेचा राजा', दिनबंधू मा. आर. आर. पाटील गौरव अंक, २००८.

४) साप्ताहिक मिरज टाईम्स, आर. आर. पाटील वाढदिवस विशेषांक, २००९.

५) राष्ट्रवादी मासिक (पक्षाचे अधिकृत), मार्च २०१५.

६) लोकराज्य मासिक.

वृत्तपत्रे

१) दै. पुढारी, वाढदिवस व मृत्यू विशेष पुरवण्या.

२) दै. तरूण भारत वाढदिवस पुरवण्या विशेषांक.

३) महाराष्ट्र टाईम्स विशेषांक लेख.

४) दै. लोकसत्ता लेख व विशेष पुरवण्या.

English News Papers

1) Times of India.

2) Indian Express.

3) Mumbai Mirror.

4) Mid Day.

5) Hindustan Times.

संशोधक विद्यार्थी
साळुंखे रविराज रामचंद्र

मार्गदर्शक
प्रा. डॉ. सुर्यवंशी नारायण बाबूराव
इतिहास विभागप्रमुख,

शिवनेरी महाविद्यालय, शिरूर,
अनंतपाळ, जि.लातूर